महाराष्ट्र शासन

## संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१

संकेतस्थळ - med-edu.in

दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५


क्र.संवैशिवस/माजी सैनिक मुले-मुली/शिक्षण सवलत/परिपत्रक/२०२५ दिनांक :- १० /०९/२०२५

**परिपत्रक**

प्रति,

अधिष्ठाता,

सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये,

महाराष्ट्र राज्य

विषय :- माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्कासंदर्भात सवलत देणेबाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एचडीएफ-१०७९/२२२९२० (५३७) साशि-५, दिनांक १४ जानेवारी, १९८५

२) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एन.डी.एफ. १०९४/ १६६८/ ९४/ तांशि-५, दिनांक १३ सप्टेंबर, १९९४

३) शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.सैशोस-२००३/ ६०१/ ०३/ मशि-१, दिनांक १९ जून, २००४

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.१००६/१६०/०६/मशि-६, दिनांक ०९.०२.२००७

५) माहिती व तंत्रज्ञान विभाग , शासन निर्णय क्र.साप्रवि-मातंस-२०१८/ प्र.क्र.१३८/से-१/३९, दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१८

६) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), परिपत्रक क्र.उशिसं/ शिष्य/ २०२१/ माजी. सै.पा. शै.सवलत/२७२९, दिनांक २१ मार्च, २०२२

उपरोक्त विषयावाबत संदर्भीय शासन निर्णयान्वये/परिपत्रकान्वये राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलत देय आहे. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर वा नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा या हुद्यापेक्षा कमी हुद्यावरुन) निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना/पत्नींना/विधवांना शैक्षणिक सवलत देण्यास शासनाने मान्यता देण्यात आलेली आहे.

(कृ.मा.प...)

माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्कासंदर्भात शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्कासंदर्भात सवलत देणेबाबत शासनाने उपरोक्त संदर्भान्वये वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. तरी याबाबत संबंधित विभागाच्या शासन निर्णय/परिपत्रकांच्या अनुषंगाने महाविद्यालयास्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई